**Statement of T. Arumugam Pillai, Muthialpet High School, 97, Thambu Chetty Street, Madras.**

1. My child of nine months had an attack of diarrhoea and the discharges were of a peculiar red colour causing us much anxiety. A similiar attack 4 months back while the child was at Chittoor was cured by the D. M. S. O. after much trouble. I feared similar trouble on this occasion also and wished to go to Chitoor for treatment. But my wife prayed to Baba, put his udhi into the milk and gave it to the child in the morning. That very day the diarrhoea was cured.

2. About 50 days back, I was desirous of getting a pair of silver jyothi lights to be lit before Baba for worship. I had only Rs. 5/- to buy them with and went to a silver shop. That shopman told me that the minimum price he could charge for a pair was Rs. 7/-. So I was leaving the place giving up all hope of getting a silver pair of lamps. Suddenly the next shopman whose son had been a student under me, called me, learnt from me what I was in need of and presented me with a silver pair of jyothis and refused to accept any price for the same. Here was Baba's help to me to carry on my worship of his picture in the manner I desired.

3. Baba's help to me on the financial side also is quite noteworthy. My private tuition income of Rs. 25 a month I badly equired to occupy my premises for which I had to pay Rs. 25 as rental. That tuition suddenly stopped in April last. I had to vacate the place, I feared. It is no joke to find another convenient place. When I was worried about this and was thinking of vacating the place, the head clerk of my school suddenly came in and of his own accord suggested that I might continue to occupy one half of my premises and lease the other half. The idea of was quite new to me, but was excellent. But where are we to go for a vegetarian co-tenant (myself and my wife being strict vegetarians). The problem remained to be faced. In few hours, a newly wedded couple, strictly vegetarian, was badly in need of such quarters and applied to my friend, the head clerk, and he introduced them to me. There was a legal difficulty, as the landlord's permission may be

needed for a sub-lease. My wife cast lots before Baba and Baba ordered the sub-lease. The landlord agreed also. Just at that time the same pupils again wanted their tuition and my income was restored.

Very recently I was at Chittoor and wished to take a bus starting at night to proceed to Madras. It was about midnight when I went to the bus. It was all dark. There was none there, so far as I could see. I got into a seat to rest awhile. Presently a drunken person came to me with insulting words. I told him that I would talk to him after he regained sobriety in the morning. The man fulminated abuse and threats and then took up an iron handle (which is used for starting the car). He heaved it high and, with the remark that he would kill me, and was about to bring it down on my head. I was helpless and shouted "Baba". The driver suddenly jumped up (evidently roused from his sleep by the noise) and seized the handle and my life was saved. My faith in Baba has become firmer by this instance of his protecting me.

**T. Kuppuswami Sastri (aged 52) Son of Ramswamy Sastri, Station Master, Singaperumal Koil, says:—**

There was chest pain for five years troubling me till 13-4-1939. Then I got Udhi and picture of Sai Baba from Ramnath Sastri. I used it and prayed to Baba. That date there was no more of chest pain. That pain used to afflict me every day from 3 p. m. for about 15 minutes and again at midnight with greater virulence and I had to take in Soda Powder to reduce the pain. But after I used the Udhi I have had no pain at all and I do not use soda powder or any other medicine. This is clear proof of the powers of Baba and His Udhi. I am daily worshipping Baba's portrait along with Sri Rama's.

**Miss K. V. Lalitha** (June 1939)

I have great reverence for Baba. I worship his picture and I pray to him often. When I left behind my Geography practical book one day at home, I feared that my teacher would severely scold me and I prayed to Baba for help. When the Geography

hour came, the Geography teacher was absent. I was so glad But suddenly an L. T. Teacher came up and wanted to hold the Geography class. I then frankly told the L. T. Lady that I had left my book behind. That lady merely told me to bring it the next day and took no further notice of my omission.

Another day when the periodical examination was very near, my English text book which I left at the school was missing. I was very much upset and I prayed to Baba. In half an hour, my friend Miss Priscilla who had by mistake taken it away returned it.

When I went up for the last S. S. L. C. Examination I was diffident about the result. A relation of mine went up and looked at the marks before the publication of the results and informed me that I got 1 or 2 marks below the necessary minimum in 1 or 2 subjects and that there would be hope for me if there was a moderation. I intensely prayed day after day to Baba to get me a pass Though no moderation was allowed, grace marke were added or allowances made in some cases. When the results were published, my name was in the pass list.

In 1937 October, my cousin Santa of Erode aged then nearly two years had enlargement of the liver for months and the case was serious. Treatment by English and "Jemmi" medicines proved of no avail. Then when Jemmi medicines were continued, Baba's udhi was applied to her body and given in bits for her to eat. Then the disease grew less severe. In a year she became alright.

Another couin ot mine, Gururajan had liver and spleen enlargements ever since he was one or two years old. Gradually he got better and seemed to be cured in his 7th year. But in his ninth year i. e., two years ago he had a sudden relapse and he passed blood in his urine. His life was despaired of. We gave him Baba's picture and udhi and advised his parents to make vows to Sai Baba. Then he had treatment from Dr. Mac Roberts. The boy had some visions of some one visiting him also. He is alright for the last 18 months.

**Sow- Amritam (Mrs. N. Subramanya Iyer) Dindigul.**

Last April, I had typhoid fever. On the 15th day, when fever was still high, at 6-30 p. m. a figure appeared before me. He was seated in Padmasana form. He spoke to me, advising me not to lose my temper when dealing with children. "If you avoid" said he "getting so frequently angry with children, then you will be blest". He uttered many sanskrit stanzas which seemed to stress the truth that children are obtained by parents as the fruit of much merit. Then he disappeared. From that time, my temperature steadily decreased and I recovered my health.

Sow. Kantimati Ammal, daughter of Virabadra Pillai of this town, aged 20, has been for three or four years longing for issue. We knew it and some five months back I gave her Baba's Udhi and old her to smear it on her forehead. I told her that by Baba's grace she would have issue. She went away. Now she is in thItamily way.


## NOTICE

"SHRI SAI LILA"

To meet the wishes of the South Indian Non-Marathi reading devotees of **Shri Sai Baba** of **Shirdi,** the Sansthan Committee is anxious to have an independent English Issue of the Sai Lila Marathi Magazine. With however the present world-wide econmic conditions any attempt in that direction is not possible unless a number of such devotees offer themselves as subscribers to make it at least self supporting. The Sansthan Committee have made a beginning by publishing half the portion of the Magazine in English with the first Joint Issue of the Cureent Shake year 1861 which is now out and hopes that the South Indian devetees encourage them in their undertaking by subscribing to the Magazine.

*The Anuual subscription iucluding postage is Rs. 3/6, and the address of the Editor is.*

**R. V. Ghaisas,** GOKHALE ROAD, (NORTH) DADAR, BOMBAY 14.

37, Charai Road, Thana, 24-12-'39

**S. N. KHARKAR,**
*Hon. Secretary*
**Shri Sai Baba Shirdi Sansthan Committee.**



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूतघाऽत्मभूत्या ऽ निशजनितमहे शीलधिक्षेत्रधिम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साईनाथः ॥


वर्ष १९ | श्रीसद्गुरु साईनाथ | अंक १०-११-१२
सन १९४२ | | आक्टो.-नव्हें.-डिसें.


## "श्री साईलीला" मासिका संबंधीं सं. कमिटी मार्फत खुलासा.

शके १८६२, वर्ष १७चा जोड अंक १-२-३ यांतील सम्पादकीय लेखांत नमूद केलेप्रमाणें मद्रास भक्तांनीं "श्री साईबाबा शिरडी संस्थानचे केवळ प्रेम सहकार्य" म्हणून "साईसुधा" नांवाचें स्वतंत्र इंग्रजी मासिक बाबाभक्ती प्रचार कार्याकरितां सुरू केल्यामुळें श्री साईलीला मासिकांत इंग्रजी भाग घालणेचे बंद करून केवळ मराठींतच ते पूर्वीप्रमाणें चालू ठेवणेंत आले.

मूळ "साईसुधा" हें मासिक ज्या मद्रास मंडळामार्फत सुरू करणेंत आले त्याचे हल्लीं "ऑल इंडिया साई समाज" या नवीन संस्थेत परिवर्तन झालेलें आहे. या नवीन स्थापन झालेले संस्थेचे हेतू केवळ बाबाभक्ती प्रचारच नसून फारच व्यापक आहेत. त्यांचे म्हणणें, ती संस्था अगदीं स्वतंत्र असून

तिचा शिरडी संस्थानशीं कोणताही संबंध नाहीं! तेव्हां त्यांचे शिरडी संस्थानशी पूर्वींचे प्रेम सहकार्य कसें राहणार? असो.

अलिकडे गेली ३—४ वर्षें साईलीला मासिक ही एक संस्थानास ७००–८०० रुपयाचे खर्चाची बाब होऊन राहिली आहे व वेळोवेळीं भक्तांचे सहकार्य वाढवून हा संस्थानवरील बोजा हलका व्हावा। या दृष्टीनें केलेले प्रयत्न हा वेळ निष्फळच ठरून, मासिक बंदच करावें कीं काय हा प्रश्न संस्थान कमिटीपुढें प्रामुख्यानें येऊन अखेर सर्वानुमतें या प्रश्नाचे बाबतींत नुकताच पुढील निर्णय ठरला आहे.—

श्री साईलीला मासिकाची व्यवस्था पुढील मंडळाकडे सोंपवून तें चालू ठेवावें:– (१) रा. बा., मो. वि. प्रधान, (२) रा. सा., य. ज. गाळवणकर, (३) श्री. य. ना. गोरक्षकर, (४) श्री. श्री. ना. खारकर, असे चार संस्थान कमिटीचे सभासद व (५) श्री. शंकरराव वांकोलेकर व (६) श्री. दाजीसाहेब अवस्थी, भक्त मंडळाचे दोन सभासद. (ठ. नं. १० सं. क. ची सभा ता. २०-१०-४२)

वरील निर्णयानुसार लीलेची व्यवस्था या नवीन मंडळाकडे नवीन वर्षे सन १९४३ पासून येईल. चालू जागतिक परिस्थितीनुरूप तूर्त मासिकाचे त्रैमासिकच जोड अंक काढणें शक्य होईल. नवीन वर्षापासून अंकांत इंग्रजी मजकुराची जोड घालणेंत येणार आहे. या कामीं श्री. एस्. बी. केसवय्या यांनीं मदत करणेचें आश्वासन दिलेलें आहे. सदर मद्रास भक्त, यांची मद्रास प्रांतांत बाबा आदेशित म्हणून फार बोलबाला आहे. त्यांची बाबांचे ठिकाणची निष्ठा अवर्णनीय आहे, लीला बंद न करितां चालू ठेवावी अशी त्यांची

उत्कट इच्छा त्यांनीं वेळोवेळीं लेखी कळवून संस्थान कमिटीचे आतांचे निर्ण-याचे वेळीं ते शिरडींत हजर होते. ते बाबांची शिरडी व शिरडी संस्थान याचे चाहते आहेत.

गेले पुण्यतिथी उत्सवाचेवेळीं मद्रास भक्तांचे एक मंडळ, मद्रास भक्तांचे शिरडी संस्थान बरोबर असलेले प्रेम सहकार्यास कांहीं व्यक्तींचे धोरणामुळें निष्कारण बाध उत्पन्न होऊन गैरसमज उत्पन्न झालेचे दिसून आलेमुळें, या बाबतींत समक्ष खुलासा करणेचे उद्देशानें आलेले होते. त्यांनीं शि. सं. क. चे सभासदांबरोबर खुले अंतःकरणानें विचारविनिमय करून, बाबांचे शिरडी हे आदिपीठ आहे व त्या आदिपीठाचे व्यवस्थापक कायद्याने प्रस्थापित असे जे शिरडी संस्थान त्याचेच मार्फत सर्व व्यवहार चालणें हेंच योग्य होय. या संस्थेमार्फत बाहेरप्रांतीय भक्तांची सर्वतोपरी फारच समाधानकारक व्यवस्था ठेविली जात आहे याची त्यांस पूर्ण जाणीव आहे व बाबांच्या शिरडीचे सर्वतोपरी महत्व वाढविणेचे कामीं बाहेर प्रांतांतून मदत गोळा केल्यास तिचा विनियोग शि. सं. मार्फतच करणें योग्य आहे असें कबूल केलें. या त्यांचे कबुलीचे वेळीं अशी मदत गोळा करणारे एक मद्रास भक्त, श्री. दुर्गिया नायडु, वाल्टेर, या मंडळांत हजर होते. त्यांचेकडून त्या कबुलीनुरूप आज दोन हप्त्यानें रु. २००० संस्थानकडे भक्तांचे उतरणेचे सोईकरितां इमारती बांधणेकरितां म्हणून आले आहेत. व जसजशी रक्कम गोळा होईल तसतशी ती आपण पाठवीत जाणार असलेचे त्यांनीं कळविलें आहे.

येणेंप्रमाणें मध्यंतरी बाबाभक्ती प्रचार कार्यांत जे कांहीं गैरसमज उत्पन्न झाले होते त्यांचा उलगडा अशा समाधानकारक रितीनें झाला ही तरी एक

बाबांचीच लीला व शि. सं. क. चे कार्य आज ज्या रितीनें उरकले जात आहे त्याची त्यांस पसंती असलेचे द्योतकच आहे.

तरी आतां बाबा भक्तांस अगत्याची विनन्ती कीं प्रत्येकानें वर्गणीदार होऊन व मिळवून देऊन लीला कार्यास हस्ते परहस्ते मदत करून बाबासेवेचे श्रेय सम्पादन करावे.

नवीन वर्षापासून लीलेची वार्षिक वर्गणी रु. ३।। [ ट. सुद्धां ] ठरविली असून वर्गणीदाराकडे नवीन वर्षाचा पहिला अंक व्ही. पी. नें रवाना करणेचें ठरविलें आहे, तरी त्याचा स्वीकार होईल अशी उमेद आहे

१७ चरई रोड, ठाणें.
१७ डिसेंबर १९४२.

श्री. ना. खारकर
ऑ. चि. शि. क.

---

## चुकींची दुरुस्ती

श्री साईलीला, अंक ४, ५, ६ माहे एप्रील, मे, जून १९४२ वर्ष १९ यांत पान ४१९ वर शिरडीवृत्त, मार्च १९४२ देणगी सदराखालीं श्री. बाळमुकुंद दत्ताराम पिळगांवकर यांनीं मंदिरांत लावण्याकरितां ४ हांड्या दिल्या आहेत या मजकुराचे ठिकाणी " कै. मेघःशाम नारायण लाड यांचे स्मरणार्थ त्यांचे चि. डॉ. जे. एम. लाड व मि. पी. एम. लाड यांनीं श्री. बा. द. पिळगांवकर यांचे मार्फत श्रीचे मंदिरांत लावण्या करितां चार हांड्या दिल्या आहेत. " असे वाचणे.

संपादक

## ॥ श्री साईहनुमान प्रसन्न ॥

या वर्षी श्री शिरडी येथें सन १९४२ च्या श्री साईबाबांच्या पुण्यतिथीच्या उत्सवांत श्री. प. प. नारायणाश्रम स्वामी मु. बाई, पुर्वीचें नांव श्री. नारायण महादेव ठोसर मु. विलेपार्ले, बाबांचे एक जुनें भक्त यांनीं स्वतः हजर राहून नेहमीं भजनांत म्हटलेल्या पदापैकीं कांहीं पदें नमुन्यासाठीं साईभक्तांच्या माहितीस्तव येथें देत आहों.

( आदा जान देते—या चालीवर )

बाबा धांव घ्याहो, बुडतों प्रवाहीं । बाबा धांव घ्याहो,
भवाब्धि तारक दुजा कोणी नाहीं ॥ मला ॥ बाबा कोणी नाहीं ॥
साई कोणी नाहीं ॥ बाबा ॥ धृ. ॥
आळवी नामा दामा संत आली विठाबाई ॥ बाबा ॥ १ ॥
प्रल्हादाचे कडे लोटीं, गेला शेष शायी ॥ २ ॥
सदा रामनामीं रत, भक्त कबीर भाई ॥ ३ ॥
बहु मी अन्यायी, रक्षी बाबा साई ॥ बाबा धांव ॥ ४ ॥

### ॥ पद ॥

कधिं न्याल माहेरा, बाबा न्याल, साई न्याल माहेरा ॥
संसृती ही सासू, माया नणंद, छळिते भारी मजला
करुं नेदी थारा ॥ कधि० ॥ धृ० ॥ कामादिक हे
दीर माझे, निष्ठुर होउनि गांजिती मला,
कोंडिती अंधारा ॥ क० ॥ १ ॥ मनाजि माझ्या घराचा चाकर,
वरचढ होऊनि ठकवित मजला, फिरवी सैरां वैरा ॥ क० ॥ २ ॥
निर्गुण ब्रह्म दादला माझा । बहुतां दिसांची चुकभुल पडली,
करवी येरझारा ॥ क० ॥ ३ ॥ भ्रतार माझा भोळा शंकर
कांहीं न बोले, लोटिली पायीं, सत्गुरु दातारा ॥ कधि न्याल माहेरा ॥ ४ ॥

[ फुलमोगरा, या छकडीच्या चालीवर ]

विठ्ठला, विठ्ठला, विठ्ठला, विठ्ठला, विठ्ठल विटेवरी उभा
आहे कसा । कमळ पुष्पाचा गाभा जसा, विठ्ठल विठ्ठल ॥ धृ० ॥
आई बापाची सेवा करितां । करितां हो । लयी खुषी झाली
लक्ष्मी कांता । कांता हो ॥ वैकुंठ सोडून आला खालता ।
खालता हो ॥ म्हणे माझा पुंडलीक भेटेल कसा ॥ कमल पु० ॥ १ ॥
कौरव सभेमंदी द्रौपदी साठीं । साठीं हो । धांवत गेला हा
जगजेठी । जेठी हो ॥ अभिनव लिला दाविली मोठी । मोठी हो ॥
कांवरुणावतार झाला कसा । कमल ॥ २ ॥ जनाबाईंचे दळण
दळितो । दळितो हा ॥ शेणकुव्याच्या गवऱ्या लावितो । लावितो हा ॥
एकेक गवरी जपून थापितो । थापितो हा ॥ पदम् हस्तांचा उमटे ठसा
कमळ ॥ ३ ॥ दामाजी साठीं महार बनला । बनला हो ॥ बेदरला जाऊन
पैका ओतिला । ओतिला हो ॥ चहाडखोर बामन फजीत झाला । झाला हो ॥
यवन पाशा केला येडा पिसा ॥ कमल ॥ ४ ॥ भोळ्या नाम्याच्या प्रेमा
लागीं । लागीं हो ॥ देव जेविले त्याचे संगी । संगी हो ॥ मटमट खाल्लीं
पुरन वांगी । वांगी हो ॥ कढीचा भुरका मारी कसा ॥ कमल ॥ ५ ॥
गोऱ्या कुंभाराची माती मळीतो । मळीतो हा तऱ्हे तऱ्हेचीं गाडगी घडितो ।
घडितो हा । थोट्या हाताला बोटें आणितो । आणितो हा ॥
दिनाचा माय बाप हा विठू असा । आम्हा दिनाचा माय बाप हा विठू असा ॥
कमल पुष्पा ॥ ६ ॥

## श्लोक

[ शार्दूल विक्रीडित. ]

जो बोले जणुं भाट कीं बडबडे, वा जो मुखें दुर्बळ ।
यत्कर्णी तुलसीदलें झळकती, चित्तीं परी वादळ ॥
काढी स्त्री बहु लांबसा पदर जी कासार नीलान्वित ।
पांचांपासुनि दूर या मनुज जो, तो हो सुखी निश्चित ॥ १ ॥

## श्लोक

हृदय कमलमध्यें निर्विशेषम् निरीहम् ।
हरिहर विधिवेध्यं योगिभिर्ध्यान गम्यम् ॥
जनन मरण भीतिभ्रंशि सच्चित्स्वरूपम् ।
सकल भुवनबीजं ब्रह्म चैतन्य मीडे ॥ १ ॥

## आरती

आनंद मंगल करूं आरती हरिगुण संतनी सेवा ॥ धृ०
प्रेम धरी मंदिर पधरावो, सुंदर सुख ए लेवा ॥ १ ॥
छाप तिलक तुलसीनी माला, आयव्याछो दर्शन देवा ॥ २ ॥
सकल तिरथमारा सग्दुरु चरणें, गंगा यमुना रेवा ॥ ३ ॥
रत्न कुंभवत बाहर भीतर, अकळ स्वरूपी एवा ॥ ४ ॥
संत मिलेतो महासुख उपजे, गुरुजीं मिले तो मेवा ॥ ५ ॥
त्रिभुवन तारण भक्तउद्धरण, समझिने सानमलेवा ॥ ६ ॥
कहे प्रीतम ओळखो अनुसारे, हारेना जन हरिजेवा ॥ ७ ॥
आनंद मंगल करूं ॥

ॐ, ॐ, ॐ.

ब्रह्मार्पण होवो हे, सुखदायक गोडबोल स्वामीचे ।
करद्वय जोडुनि विनती, पुरवो लाडिवाळ, दाजिबा, याचे ॥

# शिर्डी वृत्त

## सप्टेंबर १९४२

अहमदनगर, पुणें, मद्रास, वेल्लोर, नाशीक, अनंतापूर, सोलापूर, मुंबई, सिकंदराबाद, औरंगाबाद, शिमोगा, बोर्डी वगैरे ठिकाणाहून बरेच भक्त श्रींचे दर्शनास आले होते.

### देणगी

रेशमी नक्षी हार अर्पण श्री. अक्कालम्मा C/o व्ही. जी. जयराम, स्वदेशी टाईप फाँड्री, चितांदरी, मद्रास.

क्यानव्हसची चटई ( नक्षीची ) श्रीं. गेनू रावजी जाधव, मु. मोनगांव, ता. राहुरी.

### धर्मकृत्य

लघुरुद्र, अभिषेक, अर्चनें, नेवैद्य नेहमींप्रमाणें झालें.

### कीर्तनें

संस्थान गवइ यांची गोकुळअष्टमी उत्सवाप्रीत्यर्थ दोन कीर्तनें, गणेश-चतुर्थी प्रीत्यर्थ एक कीर्तन, श्री. आहिल्याबाई पुण्यतिथी प्रीत्यर्थ एक कीर्तन श्रावण वद्य ११ व भाद्रपद शु. ११ अशी सहा कीर्तनें झालीं व श्री. द. दा. उर्फ नानासाहेब रासने यांचें कीर्तन झालें.

### नवल विशेष

श्री गोकुळअष्टमी उत्सवाप्रीत्यर्थ श्रींचे रथाची मिरवणूक झाली.

—शिरडी येथील हवापाणी उत्तम आहे.

## आक्टोबर १९४२

या महिन्यात मुंबई, पुणें, ठाणे, नाशीक, वाई, नगर, औरंगाबाद, सिकंदराबाद, मद्रास, म्हैसूर, बेंगलूर, अनंतापूर, जैठपूर, धर्मावरम्, निलगिरी गुंटकल, नागपूर, त्रिचनापल्ली, श्रीरंगम्, कुंभकोणम्, गुंटुर, बेझवाडा, वालटेर, विजगापट्टण, बल्लारी, पेनुकोंडा, नेल्लोर, तिरुपती, अमळनेर, भुसावळ, कोइमत्तुर, शिमोगा, पारनेर, एरंडोल, मिरजगांव, बोर्डी, सालमकोट, कोकोनाडा, बुंदी, करनूल, धारवाड, अडोनी वगैरे गांवची बरीच भक्त मंडळी श्रींचे दर्शनास आली होती.

## देणगी

श्री. टी. ए. सुब्रह्मण्यम् मुदलीयार, स्वदेशी टाईप फाँडी, चिंताई पेठ, मद्रास ( जीगचा नक्षीकाम केलेला हार ) अर्पण.

श्री. डी. डी. दुर्गैया, रेल्वे इनस्पेक्टर, वाल्टेर यांनी दोन वस्तु अर्पण केल्या ( १ ) सिल्व्हर जरीची चादर ( रेशमी ) नक्षीकाम केलेली, ( २ ) रेशमी जरीबुटी चादर, काठास तांबडी फीत लावलेली रंग पोपटी, श्री. मुकुंद जगन्नाथ अचार्य, अमरसी रोड मु. पो. मालाड, उशी व रजई,

श्री. एस. बी. केशवय्या, सबरजिष्टर पेनुकोंडा, एक धोतरपान किनार तांबडी हात सात. श्री. आर. विश्वनाथ टोबॅको एक्सपोर्टर कोत्ता पेठ, गटुर, रेशमी चादर, फीत हिरवी तांबडी फुलाची किनार, श्री. बापूजी पुरुषोत्तम परुळेकर, ९१ एल, कोळीवाडी, फणसवाडी, मुंबई नं. २ रेशीमकांठी नागपुरी उपरणें पान १. श्री. बी. ए. चौगुले फ. क्ला. सबजज्ज, पारनेर, गलेफ हिरवा व लाल ( सॅटिन ) जरीकोट.

कमिटिच्या ठरावाप्रमाणें श्री. द. दा. उर्फ नानासाहेब रासने, पुणें, कै. दामुअण्णा रासने यांचे तैलचित्र, श्री. गजानन शिवराम पाटणकर, सबरजिष्ट्रर एरंडोल (पू. खा.), फुलाचा कागदी हार, श्री. रा. सा. यू. बी. नारायणराव, ७ लालबागरोड, लखनौ, हिरवा जरीकांठी शेला (रेशमी) व दोन जरीकाठी गुलाबी तलम रुमाल, श्री. कचरु आनंदरुप मारवाडी (मद्रा) कापड रंग हिरवा एक वार, श्री. त्रिंबकातिन पायल, शिर्डी, हिरवे मद्रा कापड दीडवार.

## धर्मकृत्यें

नेहमींप्रमाणे अभिषेक अर्चने झालीं. या शिवाय श्रींचे पुण्यतिथी उत्सवांत भक्तांकडून श्रीविष्णूसहस्त्र अर्चनें लघुरुद्र नैवेद्य वगैरे बरेच झाले,

श्री. पार्वतीबाई भास्करराव रांगणेकर, भाऊदाजी-रोड, माटुंगा (मुंबई) यांचे गोरगरीबांस अन्नदान झालें.

श्री. श्री. ना. उर्फ नानासाहेब खारकर, ऑ. चि. [श्री. सा. सं.] ठाणे, श्रीस दोन नैवेद्य व गोरगरीबांस अन्नदान केलें.

## कीर्तनें

संस्थान गवई यांची श्रींचे पुण्यतिथी उत्सवानिमित्त पांच कीर्तनें झाली व भा. वा। ११ एक अशीं सहा किर्तनें झालीं.

श्री पुण्यतिथी उत्सव अहवाल निराळा प्रसिद्ध होत असलेमुळें उत्सव कार्यक्रम यांत नाहीं.

## नवल विशेष

श्री. शंकर दत्ताराम बळवली, वाकोला [ सांताक्रूझ ] यानी श्रीद्वारका माईत श्रीगुरुचरित्र सप्ताह केला. श्रींचे समाधीवर श्री. गोदावरी गंगेच्या कावडी दोन दिवस आणवून स्नान घातलें.

श्री. नारायण आश्रम [ पूर्वाश्रमीचे श्रीबाबांचे जुने भक्त ठोसर ] यांनीं श्रींचे निंबवृक्ष पादुकाजवळ व कै. दिक्षीत याचे वाड्यांत दोन दिवस प्रेमळ भजन केलें.

—शिर्डी येथील हवापाणी उत्तम आहे.

## नवेंबर १९४२

या महिन्यांत अनंतापूर, करनूल, कोइमतूर, मुंबई, नागपूर, बेंगलूर, उमेरेड, मद्रास, बल्लारी, शिवडी, पुणें, अहमदनगर, बेझवाडा, नाशीक, पेरंबुर कुंभकोणम्, मंगकुम्, सिकंदराबाद, हुबळी, कोचीन, येवला, बालाजापेठ, गोंदिया, शहापूर, राजमेहेंद्री, वालटेर वगैरे ठिकाणाहून बरेच भक्त श्रींचे दर्शन घेऊन गेले.

## देणगी

श्री. बी. एच. श्रीनिवासराव, पोलीस इनस्पेक्टर, बल्लारी यांनीं श्रीस एक चांदीचा गड्डू व लहान फुलपात्र.

श्री. सी. एस. बाल सुंदरम्, सी. १-६२, न्यू भोइगुडा, सिकंदराबाद

डेक्कन, हिरवे रंगाचे कापड (वायल) लांब ९ फूट रुंदी ४ फूट.

श्री. टी. व्ही. राघवलु रिटायर्ड गार्ड बी. एन. रेलवे, गोंदिया, लहान (हातरुमाल साईज) टावेल जोड.

श्री. वासुदेव नायडू (टी) नागपूर, एक लहान टावेल.

,, टी. कृष्णस्वामी नायडू मु. वाराशिवनी, लहान टावेल.

,, के. श्रीराम नायडू वाराशिवनी, एक हातरुमाल.

,, सौ. कमलाबाई श्रीनिवास, शिर्डी हाताने विणलेला एक हातरुमाल पांढरा.

## धर्मकृत्य

नेहमीप्रमाणें अर्चने अभिषेक झाले.

## अन्नदान नैवेद्य वगैरे

बऱ्याच भक्तानी नैवेद्य ब्राह्मणसुवासीन वगैरे धर्म कृत्य केलें.

श्री. द. दा. उर्फ नानासाहेब रासने ऑ, डु. से. [श्री. सा. सं. शि.] यांचे अन्नदान झाले.

## कीर्तनें

संस्थान गवई यांची आश्विन वद्य ११ कार्तिक शु. ११ अशी दोन कीर्तनें झाली.

## नवल विशेष

ता. ८।११।५२ रविवार रोजीं सायंकाळी सालाबाद प्रमाणें श्रीमंदीरांत संस्थानचे मॅनेजर श्री. गोविंदराव चिमणराव कुलकर्णी यांचे हस्ते श्रीलक्ष्मी-पूजन श्रीसरस्वती पूजन मोठ्या थाटांत झालें.

कार्तिकी महाएकादशीचे दिवशीं श्रीस पंचामृत अभ्यंगस्नान व रात्रौ श्रींच्या पालखीची गांवांतून मिरवणूक (दिपवाळींत) नरकचतुर्दशी व लक्ष्मीपूजन या दिवशीं श्रींचे समाधीस पहाटे मंगलस्नान व रात्रौ श्रीमंदिरांत द्वारकामाई, चावडी, श्रीनिंबवृक्ष, दिक्षितवाडा वगैरे ठिकाणीं दिपोत्सव झाला.

श्री. पी. एस कृष्णन C/o माडर्न हिंदु हॉटेल फोर्ट-मुंबई यांचें गायन भजन झालें.

श्रीद्वारकामाई व दिक्षीतवाडा येथें श्रीतुळशी विवाह करणेंत आला.

—शिरडी येथील हवापाणी उत्तम आहे.

॥ श्रीसाईबाबा प्रसन्न ॥

श्रीसाईबाबा शिरडी संस्थान कमिटीची सभा तारीख २०-१०-४२ मंगळवार रोजीं शिरडी येथें दिक्षीत वाड्यांत सायंकाळीं पांच वाजतां भरली होती त्या सभेचे टिपण :—

## हजर सभासदांची नांवें

| | |
|---|---|
| १ श्री. ब. ना. गोरक्षकर | ६ श्री. ना. आ. सावंत |
| २ ,, दां. वि. सांबारे | ७ ,, गो. का. गाडगीळ |
| ३ डॉ. के. व्ही. सावे | ८ ,, श्री. ना. खारकर |
| ४ श्री. तात्याजी ग. पाटील कोते | ९ ,, द. दा. रासने |
| ५ रा. ब., मो. वि. प्रधान | १० ,, र. भा. पुरंदरे |

सं. कमिटीचे चेअरमन रा. ब. मो. वि. प्रधान यांचे अध्यक्षतेखालीं सभेच्या कामास सुरवात होऊन पुढीलप्रमाणें कामें उरकणेंत आलीं :—

ठ. नं. १ गेले ता. २८-७-४२ चे सभेचे टिपण सर्वानुमतें मंजूर करणेचें ठरलें व त्यावर अध्यक्षांची सही झाली.

ठ. नं. २ संस्थानांत सोईचे व आरोग्याचे दृष्टीने जरूरीची कामें ठरवणेचें नवीन काम चिटणीस यांजकडे कमिटीने सोंपविलें होतें. या अशा नवीन सुरू करून उरकलेल्या कामांचा व त्या प्रीत्यर्थ आतांपर्यंत झालेल्या खर्चाचा चिटणीस यांनीं तारीख १-९-१९४२ चा रिपोर्ट सादर केला आहे त्याचा ही सभा साभार स्वीकार करिते व ठरविते कीं,

या कामीं आतांपर्यंत झालेली रक्कम रु. ३१७६-११-६ चा खर्च मंजूर असून आरंभिलेल्या कामापैकीं बागेंतील विहीरीचें बांधकाम वगैरे कामें पुरी करणेकरितां आतांपर्यंत वेळोवेळीं मंजुरी दिलेली रक्कम रु. ३००० चे खर्चाचे बाहेर चिटणीस यांचे मागणीप्रमाणें या पुढें रु. ५०० चे जादा खर्चास ही सभा सर्वानुमतें मंजुरी देते.

ठ. नं. ३ भक्त मंडळाचे सभासद होणेंकरितां आलेले भक्तांच्या ६ तहह्यात व ११ सामान्य सभासदांच्या अर्जास मंजुरी देणेचें सर्वानुमतें ठरले.

ठ. नं. ४ अजेंडा कलम ४ मधील पुढील सालाचे बजेटा बाबतची योजना सर्वानुमतें मंजूर करणेचें ठरलें.

ठ. नं. ५ अजेंडा कलम ५ मध्यें नमूद केलेप्रमाणें मृदंग व बागवाला यांची नांवे ता. २८-७-४२ च्या सभेच्या ठ. नं. २ कलम (क) २ यांत मंजूर केलेले योजनेंत दाखल करुन त्यांसहि वार्षिक देणगी प्रत्येकीं रु. ८ प्रमाणें देणेंत यावी असें सर्वानुमतें ठरलें.

ठ. नं ६ अजेंडा कलम ६ (१) व (२) या श्री. गोरक्षकर यांच्या सूचना त्यांनीं परत घेतल्या, त्यास सर्वानुमतें अनुमोदन देणेचें ठरलें.

ठ. नं. ७ अजेंडा कलम ६ (३) यांत नमूद केले प्रमाणें बागेची चालु असलेली व्यवस्था व त्या कामीं नेमणूक केलेला नोकर यांस कायम करणें व तें काम योग्य रितीनें उरकणेची पूर्ण जबाबदारी संस्थानचा कोठी कामगार याजकडे सोपविणे व त्याप्रीत्यर्थ कोठी कामगारास तूर्त वार्षिक रु. २० ची देणगी देत जाणें असें सर्वानुमतें ठरलें.

ठ. नं. ८ अजेंडा कलम ७ यांत नमूद असलेले रा. सा. गाळवणकर यांचे सूचनेस रा. गोरक्षकर यांनीं अनुमोदन दिलेवरून ती योजना सर्वानुमतें पसंत असलेचें ठरलें.

ठ. नं. ९ अजेंडा कलम ८ यांत नमूद केलेप्रमाणें रा. ब., मो. वि. प्रधान यांचे सूचनेचा उहापोह होऊन ती सूचना श्री. गाडगीळ यांचे पुढील पुरतीस श्री. गोरक्षकर यांनीं अनुमोदन दिलेवरून तीसह सर्वानुमतें मंजूर करणेचें ठरलें.

चालू वहिवाट अशी आहे कीं, रामनवमी उत्सवाची पेटी (५ दिवसांची) दासगणू महाराज स्वतः न वाजवता परस्पर तात्याबास उचलू देतात व त्या पेटी वसुलींत

हगामा उरकणेस सांगतात. या बाबतींत आतां तात्याबाची तक्रार कीं, पांच दिवसांची पेटी वसूली हगाम्याला पुरत नाहीं. हगाम्याला कमीतकमी रु. १५० खर्च होतो तरी दासगणू महाराजांच्या अर्जावरून कमिटीस पुढील प्रमाणें योजना करणें भाग पडत आहे. दासगणू महाराज पांच दिवसांचे जे पेटी उत्पन्न हगाम्या करितां तात्याबास देत असत ते सन १९४२ सालीं परस्पर कमिटीने संस्थानास जमा करावे व सन १९४३ सालच्या हगाम्याकरितां तात्याबास संस्थानांतून रु. १५० द्यावेत.

येणे प्रमाणें रा. ब., मो. वि. प्रधान यांचे मूळ सूचनेस पुस्ती जोडणें व त्या सूचनेचे अखेर ता. २८-७-४२ चे सभेचा ठ. नं. २ कलम ३ व ४ हे रद्द करावेत हा जो मजकूर आहे तो वगळणेचे ठरले.

ठ. नं. १० अजेंडा कलम ९ साईलीला मासिकाची व्यवस्था पुढील मंडळाकडे सोंपवून तें चालू ठेवणेचें सर्वानुमतें ठरलें.

१ रा. ब., मो. वि. प्रधान, २ रा. सा., य. ज. गाळवणकर, ३ श्री. व. ना. गोरक्षकर, ४ श्री. खारकर, चिटणीस असे संस्थान कमिटीचे सभासद व ५ श्री. शंकरराव वाकोलेकर व ६ श्री. दाजीसाहेब आवस्थी, भ. मं. चे सभासद.

ठ. नं. ११ अजेंडा कलम १० श्री. केशवराम वल्लभराम जोशी यांस त्यांची देणगी साभार स्विकारीत असलेचे कळवून त्यांचेकडून जास्त खुलासा चिटणीस यांनीं मागवावा असें सर्वानुमतें ठरलें.

ठ. नं. १२ (१) अजेंडा कलम ११ (१) श्री. रासने यांचेकडे भांडी खरेदी विक्रीचे काम सोपविलें आहे तरी तें त्यांनीं लवकर पुरें करून आपला त्या कामाचा खुलासा चिटणीस यांजकडे लवकर सादर करावा कारण डिसेंबर अखेर वार्षिक हिशेब पुरे होणेचे असतात व हें त्यांस कबूल असलेचे त्यांनीं कळविलें.

ठ. नं. १२ (२) अजेंडा कलम ११ (२) हा खुलासा झाला असलेचे चिटणीस यांनीं कळविलें व तो सर्वानुमतें पसंत ठरला.

ठ. नं. ११ (१) अजेंडा कलम ११ (३) (४) (५) व (६) या बाबी पुढील सभेपर्यंत तहकूब ठेवणेचें सर्वानुमतें ठरलें.

ठ. नं. १२ (४) अजेंडा कलम ११ (७) श्री. गाडगीळ यांनीं केलेला खुलासा दप्तरी दाखल ठेवणेचें सर्वानुमतें ठरलें.

अध्यक्षांचे परवानगीनें.

श्री. रासने यांचे सूचनेस श्री. ता. ग. पाटील कोते यांचे अनुमोदनावरून पालखी रु. ८० या किंमतीस घेणेचें सर्वानुमतें ठरलें.

अखेर अध्यक्षांचे आभार मानलेनंतर रात्रीं ८ वाजतां सभा बरखास्त झालेचे अध्यक्षांनीं जाहीर करतांना दुसरे दिवशीं सकाळीं नऊ वाजतां श्री. दुर्गीयादि वगैरे हजर असलेले मद्रास भक्तांचे विनंतीवरून श्री. केशवीया सबरजिस्ट्रार, पेनुकोंडा यांचे नेतृत्वाखालीं एकंदर हजर मद्रास भक्त मंडळाचें म्हणणें कमिटी सभासदांनीं ऐकून घेणेचें ठरलें आहे तरी त्यावेळीं सर्व सभासदांनीं हजर रहावें अशी विनंती केली.

शिरडी, ता. २०-१०-१९४२.

श्री. ना. खारकर,
ऑ. चिटणीस.

दुसरे दिवशीं ठरलेप्रमाणें मद्रास भक्तांचे मंडळाबरोबर त्यांचे म्हणणें ऐकून घेऊन संस्थानचे कार्यांत ऑल इंडिया साई समाज दुर्गीया पिलग्रीम कॉटेज स्कीम वगैरे बाबी कशा विचाराने होतात याची त्यांस जाणीव दिलेवर या पुढें शिरडी हेंच मूळ पीठ सर्व साईभक्तांनीं बाबांचे शिरडीचे सर्वतोपरी वाढीकरितां प्रयत्न करणेचें ध्येय ठेवून सर्व कार्य शिरडी संस्थान मार्फतच ठरकले पाहिजे व इतःपर कोणतेही तऱ्हेचे गैरसमज राहिले नाहीत व तसे न होऊं देणेस हें मंडळ समक्ष व वर्तमान पत्रांत खुलासे देऊन मदत करीत राहील असें आश्वासन देते असा खुलासा होऊन मद्रास मंडळाचे सभासदांनीं कमिटी सभासदांचे आभार मानलेवर हें उभयपक्षी गोष्टीचें संमेलन बरखास्त झालें.

# अनुभव

(१)

मी ऑगस्ट महिन्यांत सरकारी कामाकरितां ठाणे येथें गेलों होतों. काम वगैरे आटोपून ता. १४ रोजीं पुणें येथें परत येण्यास निघालो. स्टेशनवर येऊन तपास करतो तोंच मुंबई पुण्यामधील रेल्वेगाडया घाटामध्यें अपघात झाल्यामुळें बंद आहेत असें कळलें. दोन तीन दिवस वाट पाहून शेवटीं मोटारीनें निघण्याचें ठरविलें आणि त्याप्रमाणें ता. १९ ला मोटारीनें दादरहून निघालों.

आम्ही दादरहून दोन वाजतां निघालो गाडीमध्यें १८-२० पॅसेंजर होते आमची मोटार पांच वाजतां खोपोली फाट्यावर येऊन पोहोचली. चहापाणी वगैरे झाल्यावर पुढील प्रवासास सुरवात झाली. खंडाळ्याचा घाट चढून आम्हीं सुमारें ६ वाजतां लोणावळयास आलों. आम्हीं पुणें येथें कर्फ्यु-ऑर्डर असल्यामुळें सातच्या अगोदर पोचतों किंवा नाहीं या काळजींत होतों. घाट चढून वर आल्यावर ड्रायव्हर साहेबांनीं मोटार विशेष जोरांत सोडली, व अगोदर ण्यास नक्की पोंचू असे आम्हास वाटूं लागले. आमच्या गप्पा चालूंच होत्या तक्यांत आमची गाडी कामशेट रेल्वेगेट मधून पास होऊन आम्ही आमच्या मुख्य स्थळाजवळ येऊन पोंहोचलों.

साडेसाहाचा सुमार होता. ड्रायव्हरसाहेब काय करित होते कुणास ठाऊक ! एक सेकंदचा सगळा प्रकार आमची मोटार एका खडकावर आपटली ती इतक्या जोरानें आपटली कीं, मोटारीचे तुकडे तुकडे झाले. मोटारीचें छप्पर एका बाजूला उडलें गेले व सगळे पॅसेंजर गाडीच्या बाहेर फेकले गेले. पुष्कळच पॅसेंजरना भयंकर स्वरूपाच्या जखमा झाल्या. सुदैवानें कोणीही मृत्युमुखीं पडलें नाहीं. माझ्या डाव्या हाताचें हाड फ्रॅक्चर होऊन छातीच्या बरगड्यांना बराच जोराचा मार बसला. जवळच खडवाल गांव होतें. अपघाताची बातमी कळतांच पोलीसपाटील व कामशेटचे स्टेशन मास्तर तेथें आले. स्टेशन मास्तर फार दयाळू गृहस्थ होते त्यांनीं आमची रात्रीं उत्तम तऱ्हेची सोय केली. सेकंडक्लास वेटिंगरूम झोपण्याकरतां उघडून दिली. अंगावर मार बसल्यामुळें छातींतून व डाव्या हातांतून फार जोराच्या कळा

येऊं लागल्या. सबंध रात्रभर स्टेशनवर बसून काढली. रात्री फौजदार साहेबानें येऊन माझा जबाब घेतला. नंतर सकाळीं पहिल्या गाडीनें पुणें येथें आलों बाकीचे पॅसेंजर आपआपल्या स्थळीं निघून गेले. नंतर मी जवळ जवळ दोन महिने रजेवर होतों. साधारण बरें वाटल्यावर ऑफिसमध्यें जाऊं लागलों.

सुमारें दोन महिन्यांची गोष्ट मी नित्य नियमाप्रमाणें देव-दर्शनास गेलों होतों. तो गुरुवारचा दिवस होता. मी देवाकरितां हार घेत होतों. इतक्यांत मला माझ्या मागून कोणीतरी "बच्चा तुम अच्छा हुवा" असें विचारलें. मी मागें बघून नुसतें "हां महाराज" असें उत्तर दिलें. आणखी कांहीं मी बोलणार इतक्यांत फुलवाला "रावसाहेब हार" असें ओरडला म्हणून मी त्याच्याकडे वळून हार घेतला व त्यास दोन पैसे दिले. इतक्यांत तो मनुष्य "जान जानेका वखत था, लेकीन अल्लाने बचाया, अल्ला भला करेगा" असें म्हणून गर्दींत निघून गेला. मी त्याला पुष्कळ शोधण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ, दगडू हलवायाचा दत्त, म्हणजे नेहमींच गर्दी त्यांत गुरुवारचा दिवस मग काय विचारतां ?

मी ठाण्याहून पुणें येथें परत येतांना रा. रा. नानासाहेब खारकर यांना भेटून आलों होतों. येते वेळीं मला त्यांनीं उदी प्रसाद व बाबांचे दोन उभे फोटो दिले होते. फोटो मी माझ्या स्नेह्यास दिले. उदी प्रसाद मजजवळ होता. उदीच्या रूपानें प्रत्यक्ष बाबांनीं मला मृत्युमुखांतून सोडविलें याचें प्रत्यंतर म्हणून मला अप्रत्यक्ष रीतीनें वरील आणि त्याप्रमाणें साक्ष पटवून दिली. अशी विचारांतीं खात्री झाली.

आपला नम्र,

दु. वि. पाटकर.

(२)

श्री. ए. रामनाथन, हेडक्लार्क, नागपूर, ॲव्हिएशन डिव्हीजनचे, एक्झीक्युटिव्ह इंजिनिअरचें ऑफीस, हे श्री खारकर, चि. शि. सं. यांस ता २२-१२-४२ चे पत्रानें कळवितात कीं, आपली मुलगी शिरडीस दर्शनास येऊन गेली नंतर तिचा ॲक्झिमा रोग बिनाऔषध साफ बरा होऊन ती चांगली बोलूं व फिरूं हिंडूं लागली आहे तिने नवस केला होता त्याप्रमाणें बाबांच्या समाधीवर रेशमी कापडाचा गलेफ वाहणें आहे तरी त्याचें माप लवकर कळवावें.

# श्री साई सच्चरित

## अध्यात्मिक निरीक्षण

# अध्याय ७ वा

( ले० सुमन–सुन्दर )

करावें सर्व सृष्टीचें निरीक्षण । घ्यावें तियेपासूनि शिक्षण ॥
व्हावें स्वस्वरूपीं निमग्न । या विचारानें ॥

—श्रीमाघनाथ दीप प्रकाश २३–१४९

( मागील अंकावरून )

हें जर पूर्वीच ठरलेले तर कोणी, कोणाला आणि कां दोष द्यावा ? अनन्य भक्तीचें किंवा आध्यात्मक शास्त्राचें ' सुद्धां हेंच सांगणे आहे. पण ' निश्चितवाद ' आणि अध्यात्म एक नव्हेत. ' निश्चितवाद ' हा केवळ भौतिक आहे. तो सर्व साधारण बहुजनांला स्वैर बनवितो; जो तो आपल्याच पोळीवर तूप ओढून घेऊं लागतो, आपल्यालाच सर्व सुख मिळावे म्हणून बघतो. दुसऱ्यांना भावना आहेत, त्यांनाहि सुख मिळालें पाहिजे, ह्याची जाणीव तो ठेवीत नाहीं. व त्याचा परिणाम ' बळी तो कानपिळी होऊन समाजात माणुसकी म्हणून रहात नाहीं व सर्वत्र अनागोंदी होऊन शेवटीं सर्वांचा समूळ नाश होतो. ' अध्यात्मांत ' होतें आहे तें प्रभुसत्तेनें होत आहे व सर्वत्र एक आत्मतत्त्वच व्याप्त आहे असा जरी सिद्धांत असला तरी त्यांत माणुसकी परिपूर्ण आहे. कारण माझ्यांत जें आत्मतत्त्व आहे तेंच दुसऱ्यांतही आहे. मला जशा भावना आहेत तशाच दुसऱ्यांनाही असतात, मला सुख हवें आहे तसें दुसऱ्यांना सुखच हवें आहे, ही वृत्ति त्यांत सदैव जागृत रहाते, त्यामुळें तो स्वार्थी बनण्याऐवजीं स्वार्थत्यागी बनतो. स्वतःच्या सुखापेक्षां सर्वांच्या सुखाकडे त्याचे लक्ष असते, तेव्हां ' होणारें तें होत आहे ' असें म्हणून तो स्वस्थ आळशी बसत नाहीं

तर सर्वांना सुख देण्यासाठीं तो नेहमीं तत्पर असतो म्हणजे अध्यात्मांत स्वार्थत्याग व प्रयत्न यांच्या सहाय्याने उत्तम लोकसंग्रह साधता येतो, आपण सर्वांचे समाधान करण्यांत तत्पर असलें कीं इतरही आपलें समाधान करण्याचा प्रयत्न करतात, व त्यामुळें सर्वांचे समाधान राखून आपल्याला स्वतःचे समाधान साधतां येतें. एवढें उदात्त ध्येय ' अध्यात्मा ' चे आहे. केवळ ' निश्चित वाद ' घेऊन हें केव्हांही साध्य होणार नाहीं. कारण तेथे आपल्याला आपली उन्नति करतां येते हें म्हणण्याला सुद्धां वाव नाहीं. मग करण्याला ठाव कोठला ? म्हणून अध्यात्मांत ' निश्चित वाद ' भौतिक बाबतींत तात्कालिक प्रमाण मानला असला तरी त्याला गौणत्व दिलें आहे. ' दैवं चैवात्र पञ्चमम् " भ. गी. १८-१४ म्हटलें आहे- 'एकमेव दैवं' असें म्हटलें नाहीं. ' निश्चितवाद ' किंवा ' प्रारब्ध ' गौण म्हटल्यावर त्याच्यापेक्षां श्रेष्ठ तत्त्व असें कांहीं-तरी आहे हें ओघानेंच आलें. ' अध्यात्मांत ' त्यालाच ' आत्मा ' म्हटला आहे. कोठल्याही तत्त्वाची व्याख्या करावयाची म्हणजे ते तत्त्व त्या व्याख्येतील शब्दाच्या कक्षेत पूर्णत्वानें आलें पाहिजे. पण आत्मतत्त्व हें असें आहे कीं, तें सांगण्यास त्याची व्याख्या करण्यास जे जे शब्द योजावेत ते शब्दच त्यानें व्याप्त आहेत. म्हणूनच 'आत्मतत्त्वा'ची व्याख्या करतांना मोठे मोठे तत्त्वज्ञानीसुद्धां घोटाळतात; अखिल चराचरच ज्याच्या कक्षेंत आहे तेथें कोणते शब्द वा दृष्टांत त्याची व्याख्या करणार ? म्हणूनच ' आत्मतत्त्व ' शब्दातीत आहे असें म्हणतात व तात्त्विक विवेचनासाठीं स्थूल मानानें स्वानुभवसुलभ अशी त्याची अंशतः व्याख्या केली जाते. त्यामुळें इतरांना तें जाणून घेण्याची जिज्ञासा होते व ते स्वतः अनुभविल्यानेंच कळतें. या तत्त्वानुसार सर्वांना सुलभ अशी आत्म्याची व्याख्या अशी करतां येईल कीं, " मी जागा आहे, मला स्वप्न पडलें; मी झोंपलों होतों, या जागृति, स्वप्न, सुषुप्ति अशा तिन्ही अवस्थांमध्यें जो मीपणा अखंड जागृत असतो तो आत्मा तेंच चैतन्य !" तो जसा आपल्याला मीपणानें भासवितो तसाच तो अखिल विश्वाचा भासक आहे. तोच आत्मा मायेच्या आवरणांनीं आपल्या देहांत कोंडला गेला कीं त्याला 'जीव' ही संकुचित संज्ञा देतात. अर्थात या 'जीवा'ला दोन उपाधि येतात. एक देहेंद्रियांची मायिक उपाधि व दुसरी त्याच्या मूळ स्वतंत्र स्वरूपांतील आत्मिक उपाधि । पैकीं देहेंद्रियांची जी मायिक उपाधि आहे ती प्रारब्धजनित-पूर्व कर्मांच्या वासनाधीन-अतएव

निश्चित आहे. ती 'खा, पी, चैन कर' अशी स्वार्थलोलुप प्रवृत्ति देते व बहुसंख्यांक लोक ह्याच प्रवृत्तिच्या आधिन होतात. तदनुरुप स्वार्थी प्रयत्न करतात; पण ही प्रवृत्ति 'निश्चित' किंवा 'नियति' यांनी बांधलेली असल्यामुळें त्यांच्या प्रयत्नाचें फळ पण त्यांना तसेंच 'नियतियुक्त' मिळतें व असें झालें म्हणजे ते 'दैव किंवा निश्चितवादी प्रज्ञाहत बनतात किंवा अनिश्वरवादी चार्वाक बनून स्वैरनीति पुरस्कारितात. पण दोहों-तही कोणाला अंतिम समाधान लाधत नाहीं. आपल्या कृतिचा अखेर त्यांना वीट येतो आपलें कोठेंतरी चुकते आहे हें त्यांना कळूं लागतें व ती चूक शोधण्याची त्यांना जिज्ञासा होतेः 'ज्ञानोबाची मेख' म्हणतात ती हीच 'चूक' होय ! 'माझ्या फकिराचा न्याराच कावा !'—तो ह्याच होय ! व ह्या चुकीची जाणीव झाली कीं तेथें 'जीवा'च्या मूळ स्वतंत्र स्वरूपांतील आत्मिक उपाधी उचल खाते; हिलाच 'आत्म्याची स्वतंत्र प्रवृत्ति' म्हणण्याचा प्रघात आहे. हिला 'स्वतंत्र' म्हणण्याचें कारण 'जीव' मायेनें वेष्टित असला तरी आत्म्याचाच अंश असल्यामुळें तो मुळांत स्वतंत्र आहे. माया त्याच्यावरच भासमान झालेली आहे. तेव्हां मायेच्या उपाधि त्याच्या ह्या स्वतंत्र प्रवृत्तिला बंधक होत नाहींत ही 'स्वतंत्र उपाधि' जागृत झाली कीं जीवाला आपलें स्व स्वरूप ओळखण्याची जिज्ञासा होते.

हिलाच 'मुमुक्षा' म्हणतात व मग जीव तें स्वरूप मिळविण्याला प्रवृत्त होतो व ते मिळविण्याकरितां जे प्रयत्न तो करतो त्यांना मोक्षानुकूल कर्में म्हणतात व संशयाच्या स्थळीं कर्मसृष्टींतील मायिक उपाधिची प्रेरणा न स्वीकारतां 'जीव' आत्मिक उपाधिची प्रेरणा स्वीकारून वागूं लागतो त्यालाच खरे आत्मज्ञान किंवा आत्मनिष्ठता असें म्हणतात अर्थात् ही 'आत्मिक उपाधि' स्वतंत्र असल्यामुळें तिचे मिळणारें फळही स्वतंत्रच असते, त्याला 'नियति' चे वा 'निश्चितां' चें बंधन असूं शकत नाहीं व जसजशी ही 'आत्मिक उपाधि' बलवत्तर होते, तसतशी 'मायिक उपाधि' लय पावत जाते व शेवटीं एकमेव 'आत्मिक उपाधिचे जीवात्म्याला प्रेरक होऊन 'मायिक उपाधि' विराम पावते व असें झालें म्हणजे जीवात्मा मुक्त होतो. मुक्त होतो म्हणजे त्याच्या देहाचा नाश होतो असें नव्हें तर त्याच्या देह भावाचा नाश होतो तो देही असून विदेही होतो. त्याचा 'मी' पणा देहापुरताच संकुचित न

# श्री साईबाबा शिरडी संस्थान

## विक्रीकरितां पुस्तकें.

( कै. गो. द. दाभोळकर कृत )

| | |
|---|---|
| (१) सच्चरित | किं. रु. २-८-० |
| (२) दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजरी | ,, ०-१-० |
| (३) ,, ,, ( अध्याय ४ ) | ,, ०-४-० |
| (४) सगुणोपासना | ,, ०-२-० |
| (५) संस्थानचे नियम पुस्तक ( मराठी ) | ,, ०-६-० |
| (6) A glimpse of Indian spirituality by Rao Bahadur M. W. Pradhan B. A., LL., B., ADVOCATE & J. P. | ,, 1-0-0 |
| 7) Rules :—Shirdi Santhan of Shri Sai Baba ( English ) | ,, 0-3-0 |
| (8) A word to South Indian devotees ( English ) | ,, 0-1-0 |

वरील पुस्तकांकरितां खालील पत्त्यावर लिहून खुलासा घेणें.

(१) मॅनेजर, शिरडी संस्थान, मु. शिरडी, पो. रहाते जि. अहमदनगर

(२) ऑ. चि. श्रीधर नारायण खारकर १७ वरई ठाणा

(३) सौ. इंदिराबाई सुळेंचे द्वारकामाईतील बाबाचे रंगित तैल चित्राचे चित्र रा. रा. बाबूराव ए. इराणी बिल्डिंग ह. नं. २० विठ्ठलभाई रोड, व्हिक्टोरिया गार्डन, मुंबई यांजकडे मिळेल.

ज्या कोणास जाहिरात देणे असेल त्यांनी ऑ. चि. श्री. श्रीधर नारायण खारकर वरई आणि G. I. P. Ry. यांच्याबरोबर पत्रव्यवहार करावा.

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| श्री अमृतानुभव समश्लोकी ... ... ... ... | ६३–७० |
| महायात्रा ... ... ... ... ... ... | ७१–७४ |
| श्रीसाईच्चरित्र ( अध्याय ५ वा ) ... .... ... | ७५–९७ |
| श्री म्हाळसादेवीचे अल्पवृत्त ... ... .... | ९८–१०४ |
| शिर्डी वृत्तांत कथन ( शके १८५८–५९–६० ) .... .... | १०५–१११ |
| शिर्डीवृत्त ... ... ... ... ... ... | ११२–११६ |
| गुरुपौर्णिमा—उत्सव ... ... ... ... | ११७–१२५ |
| शेरेबुकांतील नक्कल ... ... ... ... ... | १२६ |
| पुण्यतिथी ... ... .... ... ... ... | १२७–१४३ |
| येता रामनवमी उत्सव ... ... ... ... | १४४ |
| अनुभव ... ... ... ... ... ... | १५–२० |


## CONTENTS


| | |
|---|---|
| The Ideal ... ... ... ... ... | 37–40 |
| Sage, The Ideal of Humanity ... ... ... | 41–43 |
| Glory of Rama Nama ... ... ... ... | 44–48 |
| Prof. Narke At Harda ... ... ... ... | 47–49 |
| Announcements & Appeals ... ... ... ... | 50–51 |
| Acknowledgements & Reviews ... ... ... | 52–53 |
| Experiences ( Madras Devotee ) ... ... ... | 54 |
| Experience ( Calcutta Devotee ) ... ... ... | 5–8 |


Subscribers are requested to send in the subscription Rs.3–6–0 by M. O. or intimate if they would accept V. P. P.

Devotees are requested to intimate promptly any change in their addresses to the Hony. Secy. Mr. S. N. Kharkar, 37, Charai Road, Thana.

Experiences of Devotees are welcomed for publication in this Magazine and should be sent to Editor,

R. V. Ghaisas,
Lokamanya Tilak Jubilee Trust Bldg.
Gokhale Rd. North; Dadar, Bombay 14.

श्री साईनाथ प्रसन्न

Shri Sai Baba

# SHRI SAI LILA

# श्रीसाईलीला

[मासिक] [पुस्तक

[ Anglo Marathi Magazine ]

Vol. XVI ] Shake 1861 Poush, Magha, Falgun. [ Part 10-11-12

वर्ष १६] शके १८६१ पौष, माघ, फाल्गुन. [अंक १०-११-१२

बाबा बाबा, निशिदिनिं मना बोल रे बोल बाबा ॥
बाबा नामीं, कितितरी असे दिव्य जादू अबाबा ॥



बा बाळिश्यं, त्यज शरण जा त्या न भ्या नबाबा ॥
बा बाधा ना, तुज यमगृहीं, जावयाची ऊबाबा ॥

नळनीदलगतजलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशयचपलम् ॥
क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णवतरणे नौका ॥१॥

—शंकराचार्य

Annual Subscription Rs. 3/6/- including Postage.
Each month's issue 0-4-0
Editor-R. V. Ghaisas.

श्री साईबाबा



गोदावर्याः प्रवाहो विलसति यदुदक्पार्श्वतो योजनैकम् ॥
प्रादुर्भूत्वाऽत्मभूत्याऽनिशजनितमहे शीलधिक्षेत्रधाम्नि ॥
सर्वज्ञातीयवृंदैर्विविधजनपदादागतैः स्तूयमानः ।
पूर्णब्रह्मैव साक्षाद्विजयति भुवनं पावयन्साइनाथः॥

शके १८६१ ) श्रीसद्गुरु साईनाथ ( वर्ष १६ अंक १०-११-१२

श्रीसाईनाथ

श्रीप्रल्हादबुवा बडवे पंढरपूरकरकृत

# श्रीअमृतानुभव समश्लोकी

## प्रकरणम् तृतीयम्

श्रीर्जयति । द्वितीयेतु प्रकरणे ज्ञानदेवेन सद्गुरोः स्तवनं नमनं चापिकृतं शिष्यत्व लोपतः ॥ १ ॥ पूर्वप्रकरणांतोक्तं वाग्गुणं यत्त दैवहि । स्पष्टीकृत्वोच्यते ज्ञानदेवे नास्मिन्तृतीयके ॥ २ ॥